**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.**
**कोकण परिमंडळ कार्यालय**
**ग्राहक तक्रार निवारण मंच रत्नागिरी**

---

**ग्राहक तक्रार क्र. ०५/२०१७ दाखल दि. २७.०३.२०१७**

| | |
|---|---|
| **श्री. श्रीपती भिवा सावंत**<br>**मु.पो. वाशी तर्फे देवरुख**<br>**ता. संगमेश्वर**<br>**जि. रत्नागिरी** | **तक्रारदार ग्राहक** |

**विरुध्द**

| | |
|---|---|
| **कार्यकारी अभियंता, महावितरण**<br>**विभागीय कार्यालय रत्नागिरी** | **विरुध्द पक्षकार** |
| **फोरम उपस्थिती** | **१) वि.श. गुळवणी**<br>**अध्यक्ष**<br>**२) श्री. एस. एस. तायडे,**<br>**प्रभारी सचिव तथा कार्यकारी अभियंता** |
| **ग्राहकाच्या वतीने** | **१) श्री. श्रीपत भिवा सावंत (ग्राहक)**<br>**२) श्री. जयंत पुरुषोत्तम बिवलकर**<br>**(प्रतिनिधी)** |
| **विरुध्द पक्षकाराच्या वतीने** | **अनुपस्थित** |

**महाराष्ट्र वीज नियामक आयोग, [ ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल (ओम्बुडस्मन) ] विनियम २००६ मधील ६.५ चे तरतुदीनुसार :**

## न्यायनिर्णय

ग्राहक तक्रार निवारण मंच, कोकण परिमंडल,रत्नागिरी खालीलप्रमाणे निर्णय जाहीर करीत आहे.

१) तक्रारदार यांनी, सदर अपील गाऱ्हाणे त्यांना नवीन कृषीपंप वीजजोडणी आणि विलंबाची भरपाई मिळणेसाठी दि.२७.०३.२०१७ रोजी दाखल केले आहे.

------------------गाऱ्हाण्याचे संक्षिप्त स्वरुप-----------

२) तक्रारदार यांनी सन २०१३ मध्ये कृषीपंपासाठी नवीन वीज जोडणी मिळणेसाठी विरुद्ध पक्षकार यांच्याकडे रितसर अर्ज दाखल केला. त्याचे कोटेशन दि.२२.०५.२०१३ रोजी मिळताच त्यांनी त्याची जरुर ती रक्कम विरुद्ध पक्षकार कडे जमा केली. तथापी त्यांना विहीत मुदतीत वीजजोडणी मिळाली नाही. त्यामुळे त्यांना मोठे नुकसान सोसावे लागले. त्यांनी दि.२६.१२.२०१६ रोजी तक्रारअर्ज अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, रत्नागिरी यांचेकडे सादर केला. सदर कक्षाने दि. १२.०४.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे त्यांनी हे अपील या मंचासमोर दाखल केले आहे.

---------------- वितरण कंपनीची भूमिका-----------

३) विरुद्ध पक्षकार यांनी लेखी स्वरुपात मुद्देनिहाय खुलासा दाखल केलेला नाही. परंतु त्यांचे सर्वसाधारपणे म्हणणे कक्षासमोर असे होते की पूर्वीच्या मे. उत्कमल या ठेकेदाराने काम पूर्ण केले नाही. त्यामुळे मे. गोविंदा इलेक्ट्रीकल्स यांना ठेका दिलेला आहे. तक्रारदार यांचे प्रतिक्षायादीत १० व्या क्रमांकास नाव नोंद आहे.

४) या प्रकरणाची सुनावणी आज दि. २५.०५.२०१६ रोजी घेणेत आली. तक्रारदारातर्फे प्रतिनिधी श्री. जयंत बिवलकर यांचे निवेदन ऐकले. उपलब्ध कागदपत्रे वाचली. विरुद्ध पक्षकारातर्फे कोणीही हजर राहिले नाही.

५) या मंचाच्या निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होतात.

१) तक्रारदार हे निश्चित कालावधीत कृषीपंपासाठी नवीन वीजजोडणी मिळणेस पात्र आहेत काय ?
उत्तर- होय.

२) तक्रारदार यांना कृतीमानके विनियमाप्रमाणे विलंबाची भरपाई देणे योग्य होईल काय ?
उत्तर- होय, परंतु अंतिम आदेशप्रमाणे.

३) कोणता अंतिम आदेश?
उत्तर- शेवटी नमूद केल्यानुसार.

**---------------कारणमिमांसा--------------**

६)अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने तक्रारदार यांना महावितरणच्या नियमानुसार त्वरीत वीजजोडणी द्यावी असा काहीसा संदिग्ध स्वरुपाचा आदेश केला आहे.

७) तक्रारदार यांनी कोटेशनची जरुर ती रक्कम ऑगस्ट २०१३ मध्येच भरली असून त्यास ४ वर्षे झाली आहेत. वास्तविक तक्रारदार यांना कृतीमानके विनियमाप्रमाणे विशिष्ट मुदतीत वीजपुरवठा मिळणे आवश्यक होते. तक्रारदार यांची गट नं. ६६८ ची शेती असून त्यात त्यांनी विहीर खोदली आहे. त्यांना रॉकेलवर इंजिन चालवावे लागत असल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

८) कृती मानके विनियमाप्रमाणे तक्रारदार यांना तीन महिन्यात नवीन वीज जोडणी मिळणे आवश्यक होते. सदर तरतूदीनुसार जर मुदतीत वीज पुरवठा देणेत आला नाही तर होणाऱ्या विलंबासाठी प्रति आठवडा १००. रु. भरपाई देणेत यावी असे नमूद केले आहे. इतकेच नाही तर विद्युत कायदा २००३ च्या कलम ४३(३) यामध्ये वितरण परवाना धारकास दंड ठोठावण्याची तरतूद केंद्र शासनाने केली आहे. नवीन वीज जोडण्या देणे बाबतीत जर वितरण कंपनीस अडचणी येत असतील तर त्यांचे निवारण मा. विद्युत नियामक आयोगाकडून करुन घेणे अनिवार्य आहे. प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य किंवा जेष्ठता यादीनुसार वीज जोडणी देणे या तत्वांचा वापर या ठिकाणी करता येत नाही. सदर तत्वे, वर नमूद केलेल्या कायद्यातील कठोर तरतूदीपुढे गौण ठरतात.

९) तक्रारदार यांनी त्यांच्या अर्जात विलंबाची भरपाई मिळणेची मागणी केली आहे. तक्रारदारातर्फे प्रतिनिधी श्री. बिवलकर यांनी अशी विनंती केली की तक्रारदार यांना निश्चित कालावधीत वीजजोडणी देणेबद्दलचा आदेश करुन सन २०१३ पासूनची विलंबाची भरपाई मंजूर करावी, त्यांनी कथन केले की, त्यांनी वीजजोडणीचा रीतसर अर्ज विरुद्ध पक्षकार यांना सादर करुनही त्यांना अत्यंत विलंबाने कोटेशन दिले आणि त्यांनतरही कायदयाने दिलेल्या मुदतीत वीजजोडणी देऊन वीजपुरवठा सुरु केला नाही. त्यांचे सांगणे असे आहे की या कृत्यांमुळे तक्रारदार यांना मोठे आर्थिक व मानसिक नुकसान सोसावे लागले. त्यांनी निवेदन दिले की विरुद्ध पक्षकार यांच्या दि.०२.०५.२०१५ च्या परिपत्रक क्र. २४० नुसार १५ दिवसात वीजजोडणी देणे आवश्यक होते. कोटेशन विलंबाने दिल्याने त्याचीही भरपाई मागितली आहे.

१०) तक्रारदार यांना एका निश्चित कालावधीत वीजजोडणी मिळणे आवश्यक आहे आणि त्यानुसार हे मंच आदेश पारित करीत आहे. वर परिच्छेद -३ मध्ये नमूद केलेल्या विरुद्ध पक्षकार यांच्या अडचणी असल्यास त्यांना महत्त्व देता येत नाही.

११) तथापि, तक्रारदार यांनी विनंती केलेप्रमाणे विलंबाची भरपाई मंजूर करणे प्राप्त परिस्थितीत आम्हास योग्य वाटत नाही. तक्रारदार यांनी सन २०१३ मध्ये वीजजोडणीचा अर्ज जरी केला असला तरी त्यांनी अशी जोडणी मिळणेचा तक्रारअर्ज प्रथम दि. २६.१२.२०१६ रोजी कक्षाकडे दाखल केला. तक्रारदार यांनी गाऱ्हाणे पूर्वीच दाखल केले असते तर त्यांना वीजजोडणी यापूर्वीच मिळाली असती. विरुद्ध पक्षकार ही सार्वजनिक संस्था असून, तक्रारदार यांनी मागितलेली एवढया मोठया कालावधीची विलंब भरपाई मंजूर केल्यास वितरण कंपनीवर व पर्यायाने सर्वसमान्य वीजग्राहकांवर भार पडणार आहे. यावरुन खालीलप्रमाणे अंतिम आदेश करणेत येत आहे.

सबब खालीलप्रमाणे अंतिम आदेश करणेत येत आहे.

## आदेश

**१) तक्रारदार यांना कृषीपंपासाठी नवीन वीजजोडणी त्यांच्या मागणीअर्जानुसार विरुद्ध पक्षकार यांनी दि.०५.०७.२०१७ पर्यंत देऊन वीजपुरवठा चालू करावा असा विरुद्ध पक्षकार यांना आदेश करणेत येतो.**

**२) विरुद्ध पक्षकार यांनी जर वरील निश्चित कालावधीत नवीन वीजजोडणी तक्रारदार यांना दिली नाही तर पुढे होणा-या विलंबासाठी प्रतिआठवडा अगर त्याच्या भागास शंभर रुपये याप्रमाणे विरुद्ध पक्षकार यांनी तक्रारदार यांना भरपाई द्यावी.**

**३) या आदेशाविरुध्द अर्जदारास अपील करावयाचे असल्यास खालील पत्त्यावर हा आदेश मिळाल्यापासून ६० दिवसात अपील दाखल करता येईल.**

**पत्ता :- सचिव,**
**विद्युत लोकपाल**
**महाराष्ट्र विदयुत नियामक आयोग,**
**६०६/६०८, केशवा,**
**बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, मुबंई ४०००५**
**फोन नं. ०२२- २६५९२९६५**

**वि. श. गुळवणी**
**अध्यक्ष,**
**ग्रातनिमं,कोकण परिमंडल**

**श्री .एस.एस.तायडे**
**प्रभारी सचिव / कार्यकारी अभियंता**
**ग्रातनिमं, कोकण परिमंडल**

**दिनांक :- २५.०५.२०१७**
**ठिकाण :- रत्नागिरी.**